| MHKO130013452022 | दाखल दिनांक | : | ०४/१०/२०२२ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०४/१०/२०२२ | | |
| | निकाल दिनांक | : | ०४/०८/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०३ | १० | ०० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कागल, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती प्रणिता सुहास पाटील)**

**न्यायनिर्णय घोषित दिनांक – ०४ ऑगस्ट, २०२६**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३६९/२०२२** **निशाणी क्र.०८/ब**

**गुन्हयाचा तपशिल :** गुन्हा नोंद क्र. ३८/२०२२ दि. ०१/०३/२०२२
**पोलीस स्टेशन :** मुरगूड पोलीस स्टेशन, मुरगूड, ता. कागल,

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत पोलीस ठाणे अंमलदार अधिकारी,<br>मुरगूड पोलीस ठाणे<br>**मूळ फिर्यादी संदिप पांडुरंग कांबळे.**<br>वय– ४० वर्षे, धंदा– खाजगी नोकरी<br>रा. उंदरवाडी, ता.कागल, जि.कोल्हापूर |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.ए.म्हामुलकर. |
| **आरोपी** | | **किशोर आनंदराव पाटील.**<br>वय – ३६ वर्षे, धंदा– शेती,<br>रा. सरोळी, ता.आजरा, जि.कोल्हापूर |
| **आरोपीतर्फे अभियोक्ता** | | श्री. व्ही.एम.हंचनाळे. |

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकांचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २५/०२/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | : | ०१/०३/२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | ०४/१०/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | १२/०९/२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | : | ०२/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | – |
| न्यायनिर्णय दिनांक | : | ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | —— |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| आरोपी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.स. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | किशोर आनंदराव पाटील | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ प्रमाणे नोटीस | १०.०५. २०२३ | भादंवि कलम २७९, ३३७, ३३८, सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे. | निर्दोष मुक्त | —— | —— |

**<u>भाग – क</u>**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये )

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार**

**<u>अ. अभियोगपक्ष</u>**

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | वसंत साताप्पा कांबळे (अ.सा.क्र.१) | पंच साक्षीदार | ०८ |
| २ | संदीप पांडुरंग कांबळे (अ.सा.क्र.२) | फिर्यादी | ०८ |
| ३ | बाळू दत्तू कांबळे (अ.सा.क्र.३) | प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार | ०८ |
| ४ | संतोष हिंदुराव कांबळे (अ.सा.क्र.४) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | स्वप्नील आनंदा सुर्वे (अ.सा.क्र.५) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ०८ |
| ६ | नारायण तुकाराम देसाई (अ.सा.क्र.६) | तपासी अधिकारी | ०८ |

**ब. बचावपक्ष व न्यायालयामार्फत साक्षीदार तपासण्यात आले नाहीत.**

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयामार्फत निशाणी देण्यात आलेली कागदपत्रे–**

| साक्षीदार क्रमांक | दस्तऐवज | निशाणी |
|---|---|---|
| १. | घटनास्थळ पंचनामा (अ.सा.क्र.१ यांनी सिध्द केल्याने) | २६ |
| २. | फिर्याद (अ.सा.क्र.२ यांनी सिध्द केल्याने) | २७ |
| ३. | प्रथम खबर अहवाल (अ.सा.क्र.२ यांनी सिध्द केल्याने) | २८ |
| ४. | मुरगूड पोलिस ठाणे गु.र.न.३८/२०२२ चा तपास आदेश (अ.सा.क्र.६ यांनी सिध्द केल्याने) | ३१ |
| ५. | वाहनांचा पंचनामा (अ.सा.क्र.६ यांनी सिध्द केल्याने) | ३४ |
| ६. | आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(अ) प्रमाणे दिलेली नोटीस (अ.सा.क्र.६ यांनी सिध्द केल्याने) | ३५ |
| ७. | वाहनाची ताबा पावती दिनांक ०४/०३/२०२२ रोजीची (अ.सा. क्र.६ यांनी सिध्द केल्याने) | ३६ |
| ८. | वाहनाची ताबा पावती दिनांक ०५/०३/२०२२ रोजीची (अ.सा. क्र.६ यांनी सिध्द केल्याने) | ३७ |
| ९. | मोटर वाहन निरिक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी दिलेला अपघातातील वाहनांचा तपासणी अहवाल (आरोपीने मान्य केल्याने) | ३८ व ३९ |
| १०. | बाळू दत्तू कांबळे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (आरोपीने मान्य केल्याने) | ४० |
| ११. | संदीप पांडूरंग कांबळे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र (आरोपीने मान्य केल्याने) | ४१ |
| १२. | संदीप पांडूरंग कांबळे यांचे एमएलसी प्रमाणपत्र (आरोपीने मान्य केल्याने) | ४२ |
| १३. | बाळू दत्तू कांबळे यांचे एमएलसी प्रमाणपत्र (आरोपीने मान्य केल्याने) | ४३ |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० कलम २७९, ३३७, ३३८ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) अन्वये दंडनीय अपराधांकरीता खटला चालविण्यात आला.

०२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की,**

दि. २५/०२/२०२२ रोजी सायंकाळी १८.३० वा.चे सुमारास मांगणुर, ता.कागल गावचे हद्दीत असले दिलीप खोत यांचे शेतासमोर गारगोटी ते गडहिंग्लज जाणारे रोडचे पहिल्या वळणाचे पूर्व साईड पट्टीवर आरोपीने त्याचे ताब्यातील लक्झरी बस क्र.एमएच ४८ एवाय ९४१० ही रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने, बेदरकारपणे, भरधाव वेगाने वळण घेऊन ड्रायव्हरकडील पाठीमागील बाजूने समोरुन येणा–या मोटरसायकल क्र.एमएच ०९ एफसी १४२३ ला कट मारुन जोरात धडक दिलेने मोटरसायकल चालक बाळू दत्तू कांबळे व मागे बसलेले फिर्यादी संदीप पांडुरंग कांबळे यांना गंभीर जखमी करुन जखमींना वैद्यकीय सेवा न देता व पोलिस ठाणेस न कळविता निघून गेला.

**०३.** सबब, सदर घटनेची फिर्याद फिर्यादी संदीप पांडूरंग कांबळे यांनी मुरगूड पोलीस स्टेशनमध्ये दि. ०१/०३/२०२२ रोजी नोंदवली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरूध्द गुन्हा क्र. ३८/२०२२ नोंदवण्यात आला. तपासाअंती आरोपीने भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटरवाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. सबब, आरोपीविरूध्द सदरचे दोषारोपपत्र दि. ०४/१०/२०२२ रोजी दाखल करण्यात आले.

**०४.** माझे विद्वान पिठासीन पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटरवाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) अन्वये आरोपाचा तपशील (नि.०८) निर्धारीत केले. सदर

तपशील आरोपीला मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

**०५.** अभियोग पक्षाच्या पुराव्यांअती आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर दाखल झाल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन (निशाणी क्र. ०८) वर नोंदविण्यात आले. आरोपीने मुळ तक्रारदार व साक्षीदार यांनी त्याचेविरुद्ध खोटी केस केल्याचे कथन केले.

**०६.** अभियोग पक्षातर्फे विद्वान अभियोक्ता श्रीमती एस.ए.म्हामुलकर व आरोपीतर्फे विद्वान अभियोक्ता श्री. व्ही.एम.हंचनाळे यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे देत आहे:–

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच ४८ एवाय ९४१० ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगााने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून भा.दं.वि. कलम **२७९** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **.... नाही.** |
| २. | आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच–४८ एवाय ९४१० ही अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून समोरुन येणारे मोटरसायकल क्र. एमएच.०९ एफसी १४२३ यास जोराची ठोकर देवून त्यावरील मोटरसायकल स्वार बाळू कांबळे व मागे बसलेले फिर्यादी संदीप कांबळे यांना दुखापती पोहोचवून भा.दं.वि. कलम **३३७** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **.... नाही.** |
| ३. | आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच–४८ एवाय ९४१० ही अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, | |

| | | |
|---|---|---|
| | निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून समोरुन येणारे मोटरसायकल क्र. एमएच.०९ एफसी १४२३ यास जोराची ठोकर देवून त्यावरील मोटरसायकल स्वार बाळू कांबळे व मागे बसलेले फिर्यादी संदीप कांबळे यांना गंभीर दुखापती पोहोचवून भा.दं.वि कलम **३३८** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | **.... नाही.** |
| ४. | आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच–४८ एवाय ९४१० ही वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून, बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, जनतेला धोकादायक ठरेल अशा रीतीने चालवून मोटार वाहन कायदा १९८८, कलम **१८४** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **.... नाही.** |
| ५. | आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच–४८ एवाय ९४१० ही भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवून अपघात करुन पोलिसांना अपघाताची खबर न देता व जखमींना वैद्यकीय मदत न देता तेथून पळून जाऊन मोटार वाहन कायदा कलम **१३४(१)(ब)** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | **.... नाही.** |
| ६. | अंतिम आदेश काय ? | **....आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ ते ५ बाबत</u> :–**

**०७.** मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि अभिलेखावर असलेला पुरावा हा संयुक्तरित्या असल्याने मुद्दा क्र.१ ते ५ बाबतचे विवेचन एकत्रितरित्या घेतलेले आहे.

०८. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच ४८ एवाय ९४१० ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगााने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून समोरुन येणारी मोटरसायकल क्र. एमएच.०९ एफसी १४२३ हिला धडक देवून अपघात करुन त्यावरील मोटरसायकल स्वार बाळू कांबळे व मागे बसलेले फिर्यादी संदीप कांबळे यांना गंभीर दुखापत केली व पोलिसांना अपघाताची खबर न देता व जखमींना वैद्यकीय मदत न देता तेथून पळून गेला, हे नि:संशयपणे सिद्ध केले का हे पाहणे आवश्यक आहे.

०९. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी संदीप (अ.सा.क्र.१), प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार बाळू (अ.सा.क्र.२), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संतोष (अ.सा.क्र.४), स्वप्नील (अ.सा.५), यांचा साक्षी पुरावा अभिलेखावर नोंदविलेला आहे. फिर्यादी संदीप (अ.सा.क्र.२) यांचे साक्षीपुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, दि. २५/०२/२०२२ रोजी ते व त्यांचे मित्र बाळू कांबळे असे मोटरसायकलवरुन धामणे गावी जात असता त्यांचा मांगनूर गावच्या हद्दीत लक्झरी बस क्रमांक एमएच ४८ एवाय ९४१० ने त्यांना धडक दिल्याने अपघात झाला, अपघातामध्ये त्यांच्या उजव्या पायाला दुखापत झाली व बाळू कांबळे यांच्या गुडघ्याची वाटी निघाली होती व कमरेला दुखापत झाली होती. त्यांच्या मोटरसायकलचे हेड लाईट, टायर फुटले. त्यांनी गारगोटी ग्रामीण रुग्णालय व सी.पी.आर हॉस्पीटल येथे उपचार घेतले. सदर अपघाताच्या अनुषंगाने फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद व प्रथम खबर अहवाल (नि.क्र.२७, २८) दिला. ज्या लक्झरी बसने धडक दिली ती किशोर पाटील हा चालवत असल्याचे कथन केले.

१०. प्रस्तुत गुन्हयाच्या अनुषंगाने आरोपीतर्फे फिर्यादी यांचा घेण्यात आलेला उलटतपास महत्वपूर्ण ठरतो. सदर उलटतपासादरम्यान फिर्यादी (अ.सा.क्र.२) यांनी अपघात झाला त्यावेळी त्यांना जखमा झालेल्या असल्यामुळे त्यादिवशी नेमके कोण गाडी चालवित होते हे माहिती नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले. महत्वाचे म्हणजे, सदर फिर्यादीने

त्यावेळी किशोर पाटील त्या गाडीवर चालक होते हे त्यांना मागील तारखेस कोर्टात आल्यानंतर समजल्याचे कथन करुन त्यांनी किशोर पाटील यास वाहन चालविताना प्रत्यक्षात पाहिलेले नसल्याचे स्प्ष्टपणे मान्य केले. अपघाताची नुकसान भरपाई मिळण्यासाठी बाळू (अ.सा.क्र.३) यांनी नुकसान भरपाई दावा दाखल केल्याची बाब सदर फिर्यादीने मान्य केलेली आहे. वास्तविक पाहता, सदर फिर्यादीने आरोपी चालवत असलेल्या लक्झरी बसच्या अनुषंगाने, त्याच्या भरधाव वेगाबाबत अथवा रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याबाबत कोणतेही कथन केलेले दिसून येत नाही.

**११.** फिर्याद (नि.२७) चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की सदर अपघाताच्यावेळी फिर्यादी यांचे मागून येणारे संतोष व सागर यांनी सदरचा अपघात पाहून लक्झरी बस थांबविली व बसचा नंबर पाहिला असता सदर बसचा नंबर एमएच ४८ एवाय ९४१० व त्यावरील चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव किशोर पाटील,रा.सरोळी, ता.आजरा असल्याचे त्यांना सांगितल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

**१२.** प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार बाळू (अ.सा.क्र.३) यांच्या नोंदविलेल्या साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दि. २५/०२/२०२२ रोजी ते व फिर्यादी संदीप असे त्यांच्या मोटरसायकल क्रमांक एमएच.०९ एफसी १४२३ वरुन धामणे गावी चालले असता ते मोटरसायकल चालवत होते. संध्याकाळी ५.३० ते ५.४५ वाजता मांगनूर गावच्या हद्दीत कॉर्नरला ट्रॅव्हल्सने गडहिंग्लजहून कोल्हापूरला जात असताना त्यांना धडक दिल्याने दोघेही खाली पडले, फिर्यादी संदीप यांच्या उजव्या पायाला दुखापत झाली व त्यांच्या गुडघ्याची वाटी निघाली, मांडी व खुबा फ्रॅक्चर झाला. त्यांच्या मोटरसायकलचे हेड लाईट, टायर फुटले होते, हँडेल वाकलेले होते. त्यांना तेथून गारगोटी ग्रामीण रुग्णालय येथे उपचारासाठी नेले व त्यांनी पुढील उपचार सी.पी.आर रुग्णालय येथे घेतले. महत्वाचे म्हणजे, सदर साक्षीदाराने ज्या लक्झरी बसने धडक दिली तिचा क्रमांक एमएच ४८ एवाय ९४१० असल्याचे कथन करुन ती बस कोण चालवत होते हे पाहिले नसल्याचे व तो गाडी सोडून गेला असल्याचे कथन करुन सदर लक्झरी

बस आरोपी चालवत होता अथवा कसे हे माहिती नसल्याचे कथन केले.

**१३.** प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार बाळू (अ.सा.क्र.३) यांनी अभियोग पक्षास सहाय्य न केल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने सदर अपघातातील लक्झरी बसने भरधाव वेगाने येऊन त्यांना धडक दिल्याचे, त्या गाडीचा चालक आरोपी असल्याचे, जेव्हा संतोष व सागर त्यांना उचलायला आले तेव्हा चालक आरोपी पळून गेल्याचे अभियोगपक्षाच्या कथनाबाबत अनभिज्ञता दर्शविली. महत्वाचे म्हणजे, सदर साक्षीदाराने त्यांचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाला अथवा कसे याबाबत त्यांना सांगता येणार नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले.

**१४.** प्रस्तुत अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संतोष (अ.सा.क्र.४) यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यादरम्यान दिनांक २५/०२/२०२२ रोजी मांगनूरच्या घाटात दुचाकी व ट्रॅव्हल्सचा अपघात सायंकाळी ५.३० च्या आसपास झाल्याचे व तो अपघात पाहून ते थांबल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन असे निदर्शनास येथे की त्यांनी तेथे जाऊन पाहिले असता गाडी पडलेली होती दोन इसम जखमी अवस्थेत होते एकाचा पाय पूर्ण निकामी झाला होता व एकाच्या नळीला दुखापत झाली होती, मोटरसायकलचे हेड लाईट, टायर फुटले होते, हँडेल वाकलेले होते. महत्वाचे म्हणजे, सदर साक्षीदाराने सदर लक्झरी बसचा नंबर त्यांनी पाहिलेला नसल्याचे कथन करुन सदरचा अपघात ट्रॅव्हल चालकाच्या चुकीमुळे झाल्याचे कथन करुन ते कोण चालवत होता ते माहित नसल्याचे स्पष्टपणे कथन केले. वास्तविक पाहता, सदर साक्षीदाराने सुरुवातीला सदर ट्रॅव्हल्सचा चालक किशोर पाटील असल्याचे व त्यानंतर तेथून तो पळून गेल्याचे अभियोगपक्षाच्या कथनाबाबत अनभिज्ञता दर्शविली परंतु सदर बसचा ड्रायव्हर किशोर पाटील असल्याचे व त्याचे चुकीमुळे अपघात झाल्याचे सदर साक्षीदाराने मान्य केले.

**१५.** प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संतोष (अ.सा.क्र.४) यांच्या आरोपीतर्फे घेण्यात आलेला उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने अपघाताचे ठिकाण तीव्र उताराचे असून साईडपट्टया हया घटनेवेळी खाचखळग्याच्या असल्याचे, समोरुन एखादे वाहन अचानक

आल्यास गाडी साईडपट्टीवर घेतल्यास खाचखळग्यात गाडी पडू शकत असल्याचे मान्य करुन, ते जाण्यापूर्वी घटनास्थळी बरेच लोक जमल्याचे मान्य केले. वास्तविक पाहता, सदर साक्षीदाराच्या पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की तेथे जमलेल्या लोकांकडून त्यांना अपघाताबाबत ऐकीव माहिती मिळाली असून अपघानंतर ते १० ते १५ मिनीटांनी तेथे पोहचले. महत्वाचे म्हणजे, सदर साक्षीदाराने त्यांनी आरोपीला स्वत: बस चालविताना पाहिले नसल्याचे व त्याचे चुकीमुळे अपघात झाल्याचे व तो बस चालवत असल्याचे त्याची ऐकीव माहिती असल्याचे स्पष्टपणे मान्य केलेले आहे.

**१६.** प्रत्यक्षदर्शी साक्षीदार स्वप्नील (अ.सा.क्र.५) हे दिनांक २५/०२/२०२२ रोजी ते मुंबईला ट्रॅव्हलसमधून जात असताना झोपले होते, मुरगुड स्टेशनला गाडी गेल्यानंतर त्यांना समजले की अपघात झाला आहे. सदर साक्षीदाराने सदर ट्रॅव्हल्सचा चालक कोण, सदर अपघातात कोण जखमी झाले, कशाप्रकारे जखमी झाले याबाबत माहित नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य न केल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले असता सदर साक्षीदाराने दिनांक २५/०२/२०२२ रोजी सदर बस मांगनुर गावच्या वळणावर आली असता धडक झाल्याचा आवाज त्यांना आल्याचे त्यांनी ड्रायव्हरसह खाली जाऊन पाहिले असता दोन इसम मोटरसायकलसह खाली पडलेले दिसल्याचे, त्यांना दुखापती झाल्याचे, मोटरसायकलचे वायझर, इंडिकेटर व फुटरेस्टचे तुटल्याचे व सदर बसचा चालक किशोर पाटील हा अपघात होताच आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच ४८ एवाय ९४१० ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून समोरुन येणारी मोटरसायकल क्र. एमएच.०९ एफसी १४२३ हिला धडक देवून अपघात करुन त्यावरील मोटरसायकल स्वार बाळू कांबळे व मागे बसलेले फिर्यादी संदीप कांबळे यांना गंभीर दुखापत केली व पोलिसांना अपघाताची खबर न देता व जखमींना वैद्यकीय मदत न देता तेथून पळून गेला, पळून गेल्याचे त्यांना माहित नसल्याचे कथन केले.

**१७.** प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार वसंत (अ.सा.क्र.१) यांच्या नोंदविलेल्या साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दिनांक ०१/०३/२०२२ रोजी पोलिसांनी प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२६) त्यांच्यासमक्ष केला. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान सदर पंच साक्षीदार वसंत (अ.सा.१) यांनी फिर्यादी संदीप व जखमी बाळू हे त्यांचे गावकरी असून त्यांच्याशी त्यांचे चांगले संबंध असल्याचे, घटनास्थळ हे गावापासून लांब असल्यामुळे व लोकवस्ती नसल्यामूळे तेथे गावातील लोक हजर नसल्याचे मान्य केले.

**१८.** वास्तविक पाहता, सदर पंच साक्षीदार वसंत (अ.सा.क्र.१) यांनी खालीलप्रमाणे बाबी मान्य केलेल्या आहे: अ) घटनास्थळाच्या ठिकाणी गारगोटीकडून गडहिंग्लजकडे जाणारा रस्ता घाट असून, घटनास्थळावर तीव्र उतार आहे, ब) गडहिंग्लजकडून गारगोटीकडे जाताना घटनास्थळावर तीव्र चढ आहे, क) गडहिंग्लजकडून गारगोटीकडे जात असताना घटनास्थळावर तीव्र चढ असल्याने वाहनाची गती कमी करुन गिअर बदलावा लागतो, ड) गारगोटीकडून गडहिंग्लजकडे जात असताना घटनास्थळाच्या पुढे गेल्याशिवाय समोरुन येणारी वाहने दिसत नाहीत, इ) घटनास्थळ ठिकाणी २५ ते ३० फूट रुंदीचा डांबरी रोड असून सदर रस्त्यावर नेहमी रहदारी असते, ई) घटनास्थळाच्या बाजूच्या साईडपट्टया या खड्डेसदृश व कच्चया स्वरुपाच्या आहेत.

**१९.** घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. २६) चे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, घटनास्थळी पंचनामा करतेवेळी अपघातातील दोन्ही वाहने घटनास्थळावर दिसून येत नाहीत, सदर ठिकाणी काही खाणाखुणा दिसून येत नाहीत. घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.२६) वरुन असे निदर्शनास येते की घटनास्थळ हे ७ फुट रुंद साईडपट्टीवर आहे. वास्तविक पाहता, प्रस्तुतचा अपघात हा दिनांक २५/०२/२०२२ रोजी घडलेला असून घटनास्थळ पंचनामा ०१/०३/२०२२ रोजी करण्यात आलेला आहे. एकंदरीतच, पंच साक्षीदाराने घटनास्थळाचे विस्तृत असे वर्णन

पंचनाम्याप्रमाणे चतु:सिमेसह केलेले दिसून येत नाही.

२०. प्रस्तुत प्रकरणाचा तपास तपासी अंमलदार श्री. नारायण देसाई (अ.सा. क्र.६) यांनी केलेला असून तपास आदेश (नि.३१) प्राप्त झाल्यानंतर घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा (नि.२६) करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांनी जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन अपघातील वाहनांचा पंचनामा (नि.३४) दोन पंचांसमक्ष केला. आरोपीस फौ.प्र.सं कलम ४१-अ प्रमाणे नोटीस देऊन सदरची वाहने मालकांच्या ताब्यात दिली. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने त्यांनी आरोपींविरुद्धध दोषारोपपत्र दाखल केले. सदर तपासी अंमलदारांनी देखील पंच साक्षीदाराप्रमाणे घटनास्थळाच्या अनुषंगाने बाबी मान्य केल्या असून घटनास्थळ हे साईडपट्टीवर कच्चया स्वरुपाचे असल्याचे कथन केलेले आहे. वास्तविक पाहता, अपघातामधील बसचे पाठीमागील अथवा कोणत्याही भागाचे नुकसान झालेले नसल्याचे यांत्रिकी निरिक्षण अहवाल (नि.३९) वरुन दिसून येते. अभिलेखावरील वैद्यकीय प्रमाणपत्र (नि.४० ते ४३) यावरुन प्रस्तुत अपघातातील जखमी बाळू व फिर्यादी संदीप यांना झालेल्या जखमांबाबत दिसून येते.

२१. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीपुराव्यावरुन तसेच अभिलेखावरील कागदपत्रांवरुन असे निदर्शनास येते की, सदरचा अपघात हा दिनांक २५/०२/२०२२ रोजी घडलेला असुन त्याबाबतची फिर्याद फिर्यादी यांनी दिनांक ०१/०३/२०२२ रोजी नोंदविलेली आहे. वास्तविक पाहता, फिर्याद नोंदविण्यास जवळपास ०५ दिवसांचा विलंब झालेला आहे. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता घटनेनंतर विनाविलंब फिर्याद दाखल होणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे असते. तसेच फिर्याद दाखल होण्यास विलंब झाल्यास त्या विलंबाबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण फिर्यादी अथवा अभियोग पक्षाने देणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे असते. प्रस्तुत प्रकरणात सदर विलंबाबाबत फिर्यादी अथवा तपासी अंमलदार यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच अभियोग पक्षातर्फे सदर प्रकरणात फिर्याद दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत कोणतेही समाधानकारक अथवा न्यायोचित स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

२२. उपरोक्त नमूद कारणमिमांसेचा विचार करता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार बाळू (अ.सा.क्र.३), संतोष (अ.सा.क्र.४), स्वप्नील (अ.सा.क्र.५) यांनी अभियोग पक्षास सहाय्य केलेले नाही. तसेच सदर साक्षीदारांनी अपघताच्या वेळी सदरची बस आरोपी चालवत असल्याबाबत व सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे घडल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. फिर्यादी संदीप यांनी देखील अपघात झाला त्यावेळी त्यांना जखमा झाल्याने त्यादिवशी निश्चित कोण गाडी चालवत होते हे माहित नसल्याचे मान्य करुन आरोपी सदरची बस चालवत असताना प्रत्यक्षात पाहिले नसल्याचे स्पष्टपणे मान्य केलेले आहे.

२३. सर्व प्रत्यक्षदर्शी व जखमी साक्षीदार यांना अपघातातील वाहनाचा नंबर तसेच सदर वाहन कोण चालवत होते याबाबत सांगता आलेले नसून त्यांनी सदरचा अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे तसेच आरोपी सदर वाहन घटनेवेळी चालवित असल्याचे अभियोग पक्षाचे कथन नाकारलेले आहे. अशा परिस्थितीत आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी फक्त फिर्यादी व तपासी अंमलदार यांचा पुरावा पुरेसा ठरत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने सदरचा अपघात आरोपीच्या निष्काळजीपणामुळे, हयगयीपणामुळे तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन वाहन चालविल्यामुळे घडला ही बाब नि:संशयपणे सिध्द केलेली नाही असे दिसून येते. वास्तविक पाहता, प्रत्यक्षात सदरचा अपघात निश्चित कोणाच्या हयगयीमुळे, निष्काळजीपणामुळे घडला याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच अभियोग पक्षाने, आरोपीचा सदर वाहनाशी संबंध प्रस्थापित करणारा, आरोपीच सदरचे वाहन चालवित होता व सदरचा अपघात आरोपीच्या निष्काळाजीपणामुळे घडला याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

२४. वास्तविक पाहता, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे आरोपीने वाहन चालवितांना रहदारीच्या अथवा वाहतुकीच्या निश्चीत कोणत्या नियमांचे उल्लंघन केले याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात घटनेवेळी आरोपी गाडी चालवत होता हे दाखवणारा कोणताही प्रत्यक्षदर्शी

साक्षी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच सदर गाडीशी आरोपीचे संबंध प्रस्थापित करणारा तसेच घटनेवेळी आरोपी सदर गाडी निष्काळजीपणे, बेदरकारपणे, वाहतुकीच्या नियामांकडे दुर्लक्ष करुन चालवत असल्याबाबत कोणताही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केलेला नाही. वास्तविक पाहता, सदरचा अपघात आरोपीच्या निष्काळजीमुळे, बेदरकारपणे व भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे झाला याबाबत कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे एकंदरीतच, अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने सदरचा गुन्हा केला याबाबत साशंकता निर्माण होते.

**२५.** एकंदरीत, अभियोग पक्षाने भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४(१)(ब) मधील घटकांची पूर्तता केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने आरोपीने त्याच्या ताब्यातील लक्झरी बस क्र. एमएच ४८ एवाय ९४१० ही मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगााने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून समोरुन येणारी मोटरसायकल क्र. एमएच.०९ एफसी १४२३ हिला धडक देवून अपघात करुन त्यावरील मोटरसायकल स्वार बाळू कांबळे व मागे बसलेले फिर्यादी संदीप कांबळे यांना गंभीर दुखापत केली व पोलिसांना अपघाताची खबर न देता व जखमींना वैद्यकीय मदत न देता तेथून पळून गेला, ही बाब नि:संशयपणे सिध्द केलेली नाही.

**२६.** आरोपीवरील आरोप ज्या घटनेवर आधारीत आहेत, ती घटनाच पुराव्याअभावी अभियोगपक्षाने सिध्द न केल्याने सदरचे आरोप तंतोतंतपणे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी झाले आहेत, असे म्हणता येईल. यावरुन सदर घटनेशी आरोपीचा संबंध प्रस्थापित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे स्पष्ट होते. प्रस्तुत खटल्याबाबत पोषक असा पुरावा अभियोगपक्षाने न दिल्याने प्रस्तुत प्रकरणातून आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.६ बाबत :-</u>

**२७.** ज्याअर्थी मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात आलेले आहेत, त्यावरुन हे स्पष्ट झालेले आहे की, अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप नि:संशयपणे सिध्द केलेले नाहीत. सबब, मुद्दा क्र.६ चे उत्तराचे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

<u>**आ दे श**</u>

**१.** आरोपी **किशोर आनंदराव पाटील** यांची भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ सह मोटर वाहन कायदा १९८८ चे कलम १८४,१३४(१)(ब) अन्वये असलेल्या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जामीनबंध रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये पूर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/– (रक्कम रुपये पंधरा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व अधिघोषित करण्यात आला.)**

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.08.04 18:08:57 +0530

**(प्रणिता सुहास पाटील)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कागल.**

**कागल.**
**दि. : ०४/०८/२०२६**